# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २४/०५/२०२२ (मंगळवार)

---

## पोस्टे सावनेर येथील मोबाईल चोरी चा गुन्हा उघडकीस
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कारवाई

दिनांक २४.०५.२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक उपविभाग सावनेर अंतर्गत मालमत्ता चोरीचे आरोपी चेक करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, मौजा जोगा ता. सावनेर येथे राहणारा इसम नामे प्रमोद वाढी हा चोरी चा मोबाईल वापरत असुन तो सद्या सावनेर बस स्टॅन्ड येथे उभा आहे अशी गोपनिय माहिती मिळाल्यावरून त्यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे मिळुन आलेल्या मोबाईल संबंधाने विचारपुस केली असता त्याने सुरूवातीला उडवाउडवीचे उत्तरे दिली. त्याचे वागणुकीवर संशय आल्याने त्याचे ताब्यात मिळुण आलेल्या मोबाईल फोन चे डिटेल्स पडताळले असता त्या मोबाईल च्या संबंधाने पोस्टे सावनेर अप.क्र. ८१/२२ कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल असल्याचे दिसुन आले. त्यामुळे सदर इसमास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता आरोपी प्रमोद यादवराव वाढी वय ३३ वर्षे रा. वार्ड नं. २ जोगा ता. सावनेर जिल्हा नागपूर याने तो मोबाईल सावनेर येथील जिओ मोबाईल स्टोअर्स मधुन चोरी केल्याचे सांगितले. सदर मोबाईल चोरी संदर्भात पोस्टे सावनेर येथे गुन्हा दाखल असल्याची खात्री झाल्याने आरोपी प्रमोद यादवराव वाढी वय ३३ वर्षे रा. वार्ड नं. २ जोगा ता. सावनेर जिल्हा नागपूर याचे ताब्यातील मोबाईल संच कि. ५,०००/– रू चा माल जप्त करून पुढील कायदेशीर कार्यवाही करीता आरोपी व जप्त माल पोस्टे सावनेर यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात सहा.पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार राजेंद्र रेवतकर, पोलीस नाईक किशोर वानखेडे, आशिष मुंगळे, उमेश फुलबेल, चालक अमोल कुथे, सायबर सेल चे सतिश राठोड यांचे पथकाने पार पाडली.

**सदर बातमीचा फोटो सोबत जोडलेला आहे.**



## घरफोडी

**पोलीस स्टेशन बोरी :–** अंतर्गत वार्ड क्र ३ प्लॉट न ४८ बी बुटटीबोरी २ किमी दक्षिण, येथे दि. २२.०५.२२ चे १९.०० वा ते दिनांक २३.०५.२२ चे ०८.०० वा दरम्यान, यातील फिर्यादीचे घरी कोणी नसतांना रात्री दरम्यान कोणीतरी **अज्ञात चोरट्याने घराचे आत प्रवेश करून लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने असा एकूण ३४,५००/–रू चा माल चोरून नेला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौरभ दशरथ वाढवी वय २२ वर्ष रा पालीवाल नगर वार्ड क्र ३ प्लॉट न ४८ बी बुटटीबोरी जि नागपूर यांचे रिपोर्टवरून पो स्टे बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५७,३८० भा.द.वि अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास स.फौ संजय खंडारे पो.स्टे. बोरी मो.क्र ९९२३१५९१५३ करीत आहेत.

## चोरी

**पोलीस स्टेशन रामटेक :–** अंतर्गत साटक १४ किमी दक्षिण, येथे दिनांक १४/५/२२ ते १५/५/२२ चे १८/०० वा. दरम्यान, यातील फिर्यादी याने अंकीता राईस मिल च्या बाजुला सुरू असलेल्या कॅनलच्या कामावरील स्लाईडींग मशीन ला लावलेली **एसी.एमइ पॅक कंपनीचे गेर बॉक्स फिनीशींग रोल व मोटार फिनीशींग रोल किंमती ५९,०००/–रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रतिक नहरीभार्द पटेल वय ३५ वर्ष रा. गार्डन सिटी प्लॉट क्र. २८८ अंकेश्वर जिल्हा भरूज ह. मु. साटक ता. रामटेक यांचे रिपोर्टवरून पो स्टे रामटेक येथे कलम ३७९ भादवी अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गजानन उकेबोन्द्रे पोस्टे रामटेकमो.न. ९८८१२४१०८९ करीत आहेत.

## मोटर सायकल चोरी

**पोलीस स्टेशन नरखेड :–** अंतर्गत नरखेड टावुन, यातील फिर्यादीने दिनांक २१/०५/२२ रोजी त्यांची स्प्लेंडर प्लस मोटर सायकल क्रमांक एम.एच.२७ डब्लु १२५६ ने नरखेड येथील ओम नारायन मंगल कार्यालय मध्ये लग्नासाठी गेले असता, फिर्यादीने त्यांची मोटर सायकल ही मंगल कार्यालयाच्या बाजुला लावुन आत गेले असता, लग्न लावुन जेवन करून मोटर सायकल जवळ गेले असता त्यांची मोटर सायकल दिसली नाही. त्यांची स्प्लेंडर **प्लस मो.सा. एम.एच.२७ डब्लु १२५६ अंदाजे की २०,०००/–रू ची कोनीतरी अज्ञात इसमाने चोरून नेली**.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नरेश शंकरराव भाकरे वय ४५ वर्ष रा.बाभुळखेडा त. आमनेर जी. अमरावती यांचे रिपोर्टवरून पो स्टे नरखेड येथे कलम ३७९ भादवी अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास स फौ शैलेश डोंगरदीवे मो क्र ९३०७७२९५२१ करीत आहेत.

## <u>अपघातात मृत्यु</u>

**<u>पोलीस स्टेशन कोंढाळी</u> :–** अंतर्गत मौजा. एन.एच ५३ निर्मल उज्वल कंपनी समोर ०७ किमी पश्चिम, यातील आयसर ट्रक क्र एम.एच. ४६ बी.यू ५२८४ चा चालक नामे – महादेव गुंडा कचरे वय ४० वर्ष रा गोंदवले कचरेवाडी ता.माण जि.सातारा. च्या चालकाने आपल्या ताब्यातील नमुद आयसर ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून **आयसर वरील नियत्रण सुटल्याने आयसर ट्रक एन.एच ५३ निर्मल उज्वल कंपनी समोर रोडच्या खाली उतरून पलटी झाल्याने नमुद आयसर चालक हा आपल्या स्वत: मरणास कारणीभूत ठरला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सरतर्फे पोलीस नाईक नितीन लौटावार पोस्टे कोंढाळी यांचे रिपोर्टवरुन पोस्टे कोंढाळी येथे कलम २७९,३०४ (अ) भादवि. सह १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला असून, पुढील तपास पो ना नितीन लौटावार मो.क्र ९५१८५६९०४३ हे करीत आहे.

## <u>आत्महत्येचा प्रयत्न</u>

**<u>पोलीस स्टेशन उमरेड</u> :–** अंतर्गत एस डी ओ ऑफिस उमरेड, येथे दिनांक २३/०५/२२ चे ०९/४५ वा यातील फिर्यादी हे एस डी ओ कार्यालय, उपविभागीय अधिकारी उमरेड येथे एस डी ओ यांचे ऑफिस मध्ये इतर प्रकरणात सुनावणी करीत असतांना आरोपी नामे– सागर मंदरे हे ऑफिस मध्ये येउन "माझे ०.२० हेक्टर आर चा सातबारा का देत नाही ? या कारणावरून स्वताचे पॅन्ट च्या खिशातुन एका प्लास्टीक बॉटल मध्ये **पेट्रोल सारखा वास येणारे ज्वलनशील द्रव्य स्वताचे डोक्यावर ओतुन खीशातुन माचीस ची डब्बी काढुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – अजय त्रंबक सकुंदरवार वय ४५ वर्ष रा. न्यु ओम नगर नील गगन अपार्टमेंट १ हुडकेश्वर रोड नागपुर यांचे रिपोर्टवरुन पोस्टे उमरेड येथे आरोपीविरूध्द कलम ३०९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला असून, पुढील तपास स पो नि राजेश पाटील मो न ९०४९९८९३४१ हे करीत आहे.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**